# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

अतिमहत्वाचे

क्रमांकः रातुमनावि / परीक्षा / उन्हाळी / 416
दिनांक : 27.01.2012.

प्रति,

विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य

**विषयः महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची यादी (Edit List) तपासून पाठविण्याबाबत.**

महोदय / महोदया,

आपणांस कळविण्यात येते की, आपल्या येथील सत्र 2011–2012 मध्ये बी.ए., बी.कॉम. व बी.एस.सी. भाग–1, 2 व अंत्य **(Final)** तसेच इतरही वार्षिक परीक्षेच्या प्रवेशीत विद्यार्थ्यांचे आपण मशीन कार्डस् पाठविले होते. त्याची संगणकाद्वारे परीक्षानिहाय तपासनीय यादी **(Edit List)** तयार केली असून दिनांक 31.1.2012 ला तपासणीसाठी घेवून जाव्यात व सर्व याद्या तपासून **शुक्रवार, दिनांक 10 फेब्रूवारी, 2012 पर्यंत** न चूकता विद्यापीठात आपल्या कर्मचाऱ्यांमार्फत **(Special Messenger)** पोहोचतील या बेताने पाठविण्याची व्यवस्था करावी.

**Edit List तपासतांना खालील गोष्टी काळजीपूर्वक पाहाव्यातः**

1. आपल्या महाविद्यालयाला महाविद्यालय क्रमांक **(College Code)** व टाऊन कोड **(Town Code)** देण्यात आलेले आहे. एडिट लिस्ट तपासतांना यादीत नमूद केल्याप्रमाणेच प्रत्येक विद्यार्थ्यांच्या नावासमोर महाविद्यालय क्रमांक **(CLG Code)** व टाऊन कोड **(TWN Code)** छापलेला आहे किंवा नाही याची खात्री करून घ्यावी.
2. परीक्षार्थीचे पूर्ण नांव (आडनांव शेवटी असावे), तसेच आईचे नांव, नामांकन क्रमांक, त्यांचे माध्यम, त्यांनी घेतलेले विषय बरोबर आहेत किंवा नाही हयाची पूर्ण तपासणी करावी, प्रात्यक्षिक **(Practical)** विषय बरोबर आहेत किंवा नाही, याची खात्री करून घ्यावी.
3. जे विषय शिकविण्याची परवानगी महाविद्यालयाला नसेल असे विषय एडीट लिस्ट मध्ये असू नये.
4. **एडीट लिस्ट मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची नांवे आहेत. परंतु ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षेची आवेदन पत्रे भरलेली नसतील अशा विद्यार्थ्यांची नांवे कृपया लाल शाईने रद्द करावी.**
5. मशीन कार्ड पाठविल्यानंतर एखाद्या विद्यार्थ्याने विद्यापीठाचे परवानगीने प्रवेश घेतला असेल व परीक्षेचे आवेदन पत्रे विद्यापीठात सादर केले असतील अशा सर्व विद्यार्थ्यांची माहिती संबंधित परीक्षेच्या एडीट लिस्टमध्ये समाविष्ट करण्यात यावी. **ही सर्व माहिती लाल शाईने लिहिण्यात यावी.**
6. या एडीट लिस्टमध्ये अनवधानाने काही नांवे जी आपल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची नसतील अशी येण्याची शक्यता आहे ती सुध्दा लाल शाईने दर्शवून त्यावर **"आमचे महाविद्यालयीन विद्यार्थी नाहीत"** असे नमूद करून रद्द करण्यात यावी.
7. तपासणी झाल्यावर अंतिम एडीट लिस्ट परीक्षा विभागात पाठविल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत विषय किंवा परीक्षा केन्द्र बदलविता येणार नाही, याची विद्यार्थ्यांना जाणीव करून द्यावी. त्यासाठी विद्यार्थ्यांना विद्यापीठात पाठवू नये.
8. **बरेच महाविद्यालयानी विद्यार्थ्यांचे नामांकन क्रमांक नमूद केलेले नाहीत. तरी त्यांनी एडीट लिस्ट मध्ये लक्षपूर्वक नामांकन क्रमांक नमुद करावे. जर नमूद नसतील तर ती जबाबदारी आपले महाविद्यालयाची राहील.**

कृपया वरील बाबी काळजीपूर्वक तपासून घ्याव्यात व दुरूस्ती कराव्यात, दुरूस्ती केल्यावर त्या सर्व याद्या (Edit List) आपल्या कर्मचाऱ्यांमार्फत विद्यापीठात वरील मुदतीच्या आत पोहोचतील अशा बेताने पाठविण्याची व्यवस्था करावी. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या एडिट लिस्ट वर विद्यापीठाच्या नियमानुसार कार्यवाही घेण्यात येईल.

आपला विश्वासू,

27/1/2012

सहाय्यक कुलसचिव(परीक्षा)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ

C:\ss\EDIT LIST.doc